Date- 12-04-2020

# केअर हॉस्पिटलमध्ये कोविड सेंटर सुरू

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

कोरोची (ता. हातकणंगले) येथील केअर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दोन दिवसांपूर्वी कोविड सेंटर सुरू करण्यात आले आहे. ६० बेडची नोंदणी असून यामध्ये १२ ऑक्सिजन तर दोन व्हेंटिलेटर बेडची व्यवस्था केली आहे. सध्या ६ कोरोना बाधित उपचार घेत आहेत.

ग्रामीण भागातील सामान्य रूग्णांना माफक दरात उपचार मिळावेत, या उद्देशाने डॉ. पी. एस. पाटील व डॉ. शुभांगी पाटील यांनी केअर हॉस्पिटलची उभारणी केली. सुरूवातीच्या काळात आरोग्य शिबिराच्या माध्यमातून विविध आजारांवर मोफत व माफक दरात आरोग्य सुविधा देण्यात आल्या. येथील अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने सुसज्ज हॉस्पिटलमुळे शासनाच्या विविध योजनांनाही परवानगी दिली आहे. या योजनांचा अनेक गरजूंना लाभ मिळाला आहे.


गतवर्षी कोरोना काळात येथे कोविड सेंटर सुरू केले होते. याचा अनेकांना लाभ मिळाला होता. गेल्यावर्षी या सेंटरमधील तीन डॉक्टरांना कोरोनाची लागण झाली होती. पण त्यांना डॉ. पी. एस. पाटील यांनी लाखाचा खर्च स्वत: करून त्यांच्यावर उपचार केले होते. त्यामुळे येथील डॉक्टरांसह इतर सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना हॉस्पिटलच्या प्रशासनाचा आधार आहे. दोनच दिवसांपूर्वी खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आवाडे यांच्या उपस्थितीत कोविड सेंटर सुरू केले आहे.



**दृष्टीक्षेपात...**

- ६० बेडची नोंदणी
- १२ ऑक्सिजन बेड
- दोन व्हेंटिलेटरची व्यवस्था
- ६ जणांवर उपचार सुरू

**गरजूंसाठी आधारवड**



आर्थिक परिस्थिती नसणाऱ्या रूग्णांना जमिनीचा तुकडा अथवा दुभती जनावरे विकायला लागू नयेत, या उद्देशाने त्यांच्यावर माफक दरात उपचार व्हावेत यासाठी या हॉस्पिटलची उभारणी केली आहे. आज शेकडो रूग्णांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देवून त्यांच्यावर चांगले उपचार केले आहेत. कोविड सेंटर सुरू करणे ही सामाजिक जबाबदारी आहे. अनेक गरजूंना त्याचा लाभ मिळावा यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. – डॉ. पी. एस. पाटील

Date- 24-04-2021



इचलकरंजी : भैरवनाथ शिक्षण समूह कोविड केअर सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आवाडे, डॉ. प्रदीप पाटील आदी.

# भैरवनाथ शिक्षण समूहातर्फे कोरोचीत कोविड केअर सेंटर

इचलकरंजी, ता. २३ : कोरोची (ता. हातकणंगले) येथे भैरवनाथ शिक्षण समूहाच्या वतीने कोरोना कोविड केअर सेंटर नुकतेच सुरू केले आहे. त्याचे उद्घाटन खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आवाडे, माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर यांच्या उपस्थितीत झाले.

सध्या कोरोनाचा प्रभाव वाढत चालला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातही कोविड केअर सेंटरची अत्यंत गरज बनली आहे. ती गरज या कोविड केअर सेंटरमुळे पूर्ण झाली आहे, असे मत खासदार माने यांनी व्यक्त केले.

आमदार आवाडे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. मिणचेकर यांनीही उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. तत्पूर्वी, प्रास्ताविकामध्ये डॉ. शुभांगी पाटील यांनी केअर हॉस्पिटलतर्फे करण्यात येत असलेल्या विविध शस्त्रक्रियांचा आढावा घेतला. डॉ. प्रदीप पाटील यांनी विविध योजनांच्या माध्यमातून देण्यात येत असलेल्या रुग्णसेवेची माहिती दिली. केअर हॉस्पिटलमध्ये शासनाकडून रॅपीड अँटिजेन टेस्ट करण्यास परवान मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषद सदस्य प्रस खोबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य देवानंद कांबळे, दशरथ पिष्टे, सचिन पोवार, पोलिसपाटील सावकार हेगडे आदी उपस्थित होते.


PICU
कोविड
REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA


OPPO A54 · ©K ❤ P
2022/05/05 15:42